जनमानसाचा निडर आवाज...

# पुणे प्राईम न्यूज

मुख्य संपादक : जनार्दन दांडगे

दैनिक | वर्ष १ | अंक १७२ | मंगळवार, १३ जानेवारी २०२६ | मूल्य : २ रु. | पाने : ४ | RNI NO - MAHMAR/2022/84210







## संक्षिप्त

### शेतात लघुशंका केल्याच्या रागातून एकाला बेदम मारहाण

**मावळ, ता. १२ :** नवलाख उंब्रे गावात एक धक्कादायक घटना घडली आहे. शेतात लघुशंका केल्याच्या क्षुल्लक कारणावरून एका ४० वर्षीय व्यक्तीला तिघांनी मिळून बेदम मारहाण केल्याचा प्रकार समोर आला आहे. या प्रकरणी तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल केला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, नवनाथ बबन शेटे (वय ४०) हे गुरुवारी ८ जानेवारी रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास नवलाख उंब्रे परिसरातील एका शेतात लघुशंका करत होते. यावेळी शेतात लघुशंका केल्याच्या कारणावरून काही जणांनी त्यांच्याशी वाद घालण्यास सुरुवात केली. सुरुवातीला शाब्दिक वाद झाला, मात्र काही वेळातच हा वाद वाढत गेला. वादाचे रूपांतर हाणामारीत झाले आणि तिन्ही आरोपींनी मिळून नवनाथ शेटे यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण केली. या मारहाणीत नवनाथ शेटे जखमी झाले. या घटनेनंतर नवनाथ शेटे यांनी शुक्रवारी ९ जानेवारी रोजी तळेगाव एमआयडीसी पोलीस ठाण्यात धाव घेऊन तक्रार दाखल केली. राहुल भगवान शेटे (वय ३८), प्रमोद भगवान शेटे (वय ३५) आणि रुद्राक्ष काळुराम शेटे (वय १८) या तिघांविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

# जिल्हा परिषद निवडणूका जाहीर होण्याआधीच मतदार फोडाफोडी सुरू

## पूर्व हवेलीत देवदर्शन, सहली, भेट वस्तूंचा पाऊस

उरुळी कांचन, ता. १२ : : सर्वोच्च न्यायालयाने जिल्हा परिषद आणि पंचायत समितीच्या प्रलंबित निवडणुका १५ फेब्रुवारी पर्यंत घेण्याचे निर्देश सोमवारी (ता.१२) राज्य निवडणूक आयोगाला दिले आहेत. मात्र, निवडणुकांची अद्याप अधिकृत घोषणा झालेली नसतानाच पूर्व हवेली परिसरात मतदारांचा कौल मि ळवण्यासाठी तसेच त्यांना आपलेसे करण्यासाठी इच्छुक उमेदवारांनी जोरदार फिल्डिंग लावल्याचे दिसून येत आहे. निवडणुकीच्या पार्श्वभूम ीवर उमेदवारांकडून देवदर्शनाच्या नावाखाली मोफत सहली, पर्यटन, लकी ड्रॉ, वस्तूंचे वाटप, आरोग्य शिबिरे व कृषी प्रदर्शनांच्या माध्यम ातून मतदारांना लुभावण्याचे प्रयत्न होत आहेत.

गेल्या दोन ते तीन म हिन्यांपासून पुणेसोलापूर व पुणेनगर रस्त्यालगतच्या गावांमध्ये खासगी बसमधून तसेच रेल्वेच्या माध्यामातून देवदर्शन आणि पर्यटन सहलींचा सपाटा सुरू आहे. मतदार व कार्यकर्त्यांना खूश ठेवण्यासाठी लाखो रुपयांचा खर्च केला जात असून, निवडणूक जाहीर होण्याआधीच प्रचाराची रणधुमाळी सुरू झाल्याचे दिसून येत आहे.




निवडणूक रिंगणात उतरण्याची तयारी करणाऱ्या इच्छुकांची संख्या मोठी असल्याने प्रत्येकजण आपला प्रभाव वाढवण्यासाठी विविध उपक्रम राबवत आहे. काही ठिकाणी थेट आर्थिक प्रलोभने, भेटवस्तूंचे वाटप, जेवणावळी, तसेच योजनांची आश्वासने देण्यात येत आहेत. ग्रामीण भागात विकासकामांची आश्वासने, लाभार्थी योजनांचा संदर्भ देत म तदारांना आकर्षित करण्याचा प्रयत्न होत आहे. मोफत नेत्र तपासणी व चष्मे वाटप, मोतीबिंदू शस्त्रक्रिया, रक्तदान शिबिरे, आरोग्य तपासणी, श्रमकार्ड व हेल्थ कार्ड वाटप अशा कार्यक्रमांची रेलचेल सुरू आहे. महिलांसाठी आणि ज्येष्ठ नागरिकांसाठी देवदर्शन व पर्यटन यात्रा, तरुणांसाठी क्रीडा साहित्य वाटप, क्रिकेट सामने आणि ओल्या पार्टीपर्यंत कार्यक्रमांचे स्वरूप पोहोचले आहे.

थेऊर, सोरतापवाडी, केसनंद, पेठ, नायगाव, कुंजीरवाडी, आव्हाळवाडी आदी भागांत विद्यमान व माजी लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते व राजकीय इच्छुकांकडून या उपक्रमांचे आयोजन केले जात आहे. गृहसंकुलांजवळ पूर्ण झालेल्या कामांचे उद्घाटन, नव्या कामांचे भूमिपूजन याचाही प्रचारासाठी वापर केला जात असल्याचे चित्र आहे.

थेऊरचे आरोग्य दूत व विद्यमान ग्रामपंचायत सदस्य युवराज काकडे, सोरतापवाडीचे माजी सरपंच व भाजपा नेते सुदर्शन चौधरी, केसनंदचे सामाजिक कार्यकर्ते प्रकाश हरगुडे, पेठचे माजी सरपंच सुरज चौधरी, नायगाव सोसायटीचे माजी अध्यक्ष कृषिराज चौधरी, माजी सरपंच आण्णा महाडिक, भाजपा युवती अध्यक्ष पूजा सणस, सिद्धांत सचिन तुपे, कुंजीरवाडीचे विद्यमान सदस्य संग्राम कोतवाल, आव्हाळवाडीचे सामाजिक कार्यकर्ते व उद्योजक संदेश आव्हाळे, व त्यांच्या कार्यकर्त्यांकडून आरोग्य शिबिरे, सहली, पर्यटन स्थळे, आदी समाज उपयोगी शिबिरांचे व देवदर्शनाचे आयोजन करण्यात आले आहे.

देवदर्शन यात्रांच्या माध्यमातून महिला मतदारांना लक्ष्य करत लोकानुनय केला जात असल्याचे दिसून येत आहे. त्यामुळे या उपक्रमांम ागे श्रद्धेपेक्षा मतपेढी मजबूत करण्याची रणनीती अधिक स्पष्टपणे दिसून येत असल्याची नागरिकांमध्ये जोरदार चर्चा होत आहे. निवडणुका नेमक्या कधी होणार याबाबत अनिश्चितता असतानाही मोठ्या प्रमाणावर खर्च सुरू असल्याने नागरिकांमध्येही चर्चा रंगू लागल्या आहेत.

देवदर्शन व पर्यटनाच्या नावाखाली मोफत प्रवास, भोजन व सुविधा दिल्या जात असल्याने अनेक मतदारांचा या उपक्रमांकडे ओढा वाढत आहे. विशेषतः महिला, ज्येष्ठ नागरिक व नवमतदार यामध्ये उत्साह दिसून येत आहे. धार्मिक स्थळांसोबत पर्यटनस्थळांना भेटी दिल्या जात असल्याने काही प्रमाणात सामाजिक संवाद व पर्यटनाला चालना मिळत असल्याचे मत व्यक्त केले जात असले तरी, या सर्व घडामोडींमागे सामाजिक कामापेक्षा राजकीय गणित अधिक ठळक असल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

दरम्यान, मतदारांनीही जागरूक राहून अशा प्रकारांना बळी न पडता लोकशाही मूल्यांचे रक्षण करावे, तसेच मतदान हा नागरिकांचा हक्क असून तो कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता, विकास आणि प्रामाणिक नेतृत्वाचा विचार करून बजवावा, असे मत राजकीय तज्ज्ञांकडून व्यक्त केले जात आहे.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका या ग्रामीण व शहरी विकासाचा पाया मानल्या जातात. त्यामुळे या निवडणुका पारदर्शक, निर्भय आणि प्रामाणिक वातावरणात पार पडाव्यात, यासाठी निवडणूक यंत्रणा आणि नागरिकांनी एकत्रितपणे जबाबदारी पार पाडणे गरजेचे असल्याचे मत व्यक्त होत आहे.


# मकरसंक्रांतीच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर मंदिरात भाविकांसाठी विशेष नियोजन

## १३ व १४ जानेवारीला दर्शन वेळापत्रकात बदल

**पंढरपूर, ता. १२ :** मकरसंक्रांती आणि भोगी उत्सवाच्या पार्श्वभूमीवर पंढरपूर येथील श्री विठ्ठलरुक्मिणी मंदिरात भाविकांची वाढती गर्दी लक्षात घेऊन विशेष दर्शन व व्यवस्थापन आराखडा राबवण्यात येत आहे. परंपरेनुसार साजऱ्या होणाऱ्या या उत्सवासाठी राज्यभरातून हजारो भाविक दाखल होत असून, यंदा महिला भाविकांसाठी दर्शन सुलभ करण्यावर मंदिर समितीने विशेष भर दिला आहे.

मंगळवार, १३ जानेवारी रोजी भोगी उत्सवानिमित्त श्री रुक्मिणी मातेची काकड आरती व नित्यपूजा पहाटे ३ ते साडेचार या वेळेत होणार आहे. भोगी अर्पण करण्यासाठी माता व भगिनींना पहाटे साडेचार ते साडेपाच या कालावधीत मंदिरात प्रवेश देण्यात येणार आहे. त्यानंतर अलंकार व पोषाख





परिधान केल्यानंतर सकाळी साहेसहा पासून दर्शन खुले करण्यात येणार आहे.

त्याच दिवशी श्री विठ्ठल मंदिरात काकड आरती व नित्यपूजा पहाटे साडेचार ते पाऊणे सहा या वेळेत पार पडेल. भाविकांसाठी पहाटे सहा नंतर पदस्पर्श दर्शन सुरू होणार आहे. बुधवार, १४ जानेवारी रोजी मकरसंक्रांतीनिमित्त नेहमीच्या पूजाविधीनंतर श्री रुक्मिणी मातेचे अलंकार परिधान करून दर्शन सुरू करण्यात येणार आहे. या दिवशी जास्तीत जास्त माता व भगिनींना दर्शनाचा लाभ मिळावा, यासाठी पुरुष भाविकांनी शक्यतो मुखदर्शन घेण्याचे आवाहन मंदिर समितीने केले आहे. गुरुवार, १५ जानेवारी रोजी काकड आरती, नित्यपूजा आणि दर्शन व्यवस्था पूर्ववत वेळापत्रकानुसार सुरू राहणार आहे. उत्सव काळात होणारी गर्दी लक्षात घेऊन दर्शनरांगा, सुरक्षाव्यवस्था आणि स्वच्छतेवर विशेष लक्ष देण्यात आले आहे. कमांडो पथकांची नियुक्ती, व्हीआयपी दर्शनावर तात्पुरते निर्बंध, टोकन दर्शन व्यवस्था बंद ठेवणे आणि पूजेची संख्या मर्यादित करून भाविकांना अधिक वेळ दर्शनासाठी उपलब्ध करून देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. दरम्यान, हा उत्सव मंदिर समितीचे सहअध्यक्ष गहिनीनाथ महाराज औसेकर व सदस्यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडत असून, भाविकांनी मंदिर प्रशासनाच्या सूचनांचे पालन करण्याचे आवाहन प्रभारी व्यवस्थापक संदेश भोसले यांनी केले आहे.

# आकुर्डीतील सुपर मार्केटसमोर रोड रोलरखाली चिरडून कामगाराचा मृत्यू

**पिंपरी-चिंचवड, ता. १२ :** शहरात सुरू असलेल्या रस्त्याच्या कामादरम्यान झालेल्या गंभीर निष्काळजीपणामुळे एका तरुण कामगाराचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना उघडकीस आली आहे. रोड रोलर चालकाने बेपर्वाईने वाहन चालवल्याने कामगार रोलरखाली चिरडला गेला. ही घटना शनिवारी (ता. १०) दुपारी आकुर्डी रेल्वे स्टेशन ते गंगानगर रस्त्यावर, आनंद सुपर म ार्केटसमोर घडली.



या अपघातात आकाश शिवा पाथरुड (वय ३१, रा. चिंचवड) यांचा जागीच मृत्यू झाला. याप्रकरणी अमोल शिवा पाथरुड (वय २९, रा. चिंचवड) यांनी निगडी पोलीस ठाण्यात ियाद दिली असून, रोड रोलर चालक सत्यम सिनाळकर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी आरोपीला ताब्यात घेऊन पुढील कारवाई सुरू केली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, आकुर्डी गंगानगर रस्त्यावर सुरू असलेल्या डांबरीकरणाच्या कामात आकाश पाथरुड कार्यरत होता. काम सुरू असताना तो रोड रोलरच्या मागे उभा राहून चालकाला दिशा दाखवत होता. त्याच वेळी चालकाने रोलर वेगाने आणि निष्काळजीपणे उलट्या दिशेने चालवला. अचानक घडलेल्या या प्रकारात आकाश रोलरखाली सापडला.

जड यंत्रसामग्रीची जोरदार धडक बसल्याने आकाशच्या डोक्याला तसेच हातपायांना गंभीर दुखापत झाली आणि त्यातच त्याचा जागीच मृत्यू झाला, असे पोलिसांनी सांगितले. घटनेनंतर परिसरात एकच खळबळ उडाली असून कामगारांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. या प्रकरणी आरोपी चालकाविरुद्ध बीएनएस कलम १०६, २८१, १२५ (ब) तसेच मोटार वाहन कायदा १९८८ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला आहे. निगडी पोलीस ठाण्याचे पोलीस उपनिरीक्षक सातपुते पुढील तपास करत आहेत.

दरम्यान, या भीषण अपघाताचे सीसीटीव्ही फुटेज सोशल मीडियावर व्हायरल झाले आहे. व्हिडिओमध्ये रस्त्याचे काम सुरू असताना आकाश पाथरुड रोलरला मार्गदर्शन करत असतानाच अचानक रोलरखाली चिरडला गेल्याचे स्पष्टपणे दिसून येत आहे. या घटनेमुळे रस्त्याच्या कामांदरम्यान सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे.

# ठाकरे–काँग्रेसच्या ४ आमदारांना मंत्रिपदाचा दर्जा

## सत्ताधारी ६ आमदारांनाही ‘लाल दिवा’, फडणवीस सरकारचा निर्णय

**मुंबई, ता. १२ :** मुंबईतून एक मोठी राजकीय बातमी समोर आली आहे. महाराष्ट्र विधिमंडळात काम करणाऱ्या सत्ताधारीच नव्हे तर विरोधी पक्षातील काही आमदारांनाही थेट मंत्रिपदाचा दर्जा देण्याचा निर्णय राज्य सरकारने घेतला आहे. यासंदर्भात सरकारकडून अधिकृत शासन निर्णय जाहीर करण्यात आला आहे. या निर्णयानुसार काँग्रेस आणि शिवसेना (उद्धव ठाकरे गट) यांच्या ४ आम दारांसह सत्ताधारी पक्षातील ६ आम दारांना मंत्रिपदाच्या दर्जाच्या सोयी-सुविधा मिळणार आहेत. विशेष म्हणजे या आमदारांना लाल दिवा, वाहन, कार्यालय आणि मानधन अशा सर्व सुविधा देण्यात येणार आहेत.

हा निर्णय विधानसभा आणि विधानपरिषदेत काम करणाऱ्या मुख्य प्रतोद आणि प्रतोदांवर लागू होणार आहे. भाजप, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आणि शिवसेना (उबाठा) या पक्षांचे मिळून एकूण १६ आमदार या निर्णयाचा लाभ घेणार आहेत. याआधी २०१७ साली तत्कालीन सरकारने एक नियम केला होता. ज्या पक्षांची सदस्यसंख्या सभागृहात १० टक्के किंवा त्याहून जास्त आहे, त्या पक्षांच्या मुख्य प्रतोदांना कॅबिनेट मंत्रिपदाचा दर्जा आणि प्रतोदांना राज्यमंत्रीपदाचा दर्जा देण्यात येणार होता. १४ व्या विधानसभेनंतर २०२१ मध्ये यासंदर्भात जीआर निघाला होता. आता १५ वी विधानसभा अस्तित्वात आल्यानंतर हा जीआर नव्याने सुधारित करून लागू करण्यात आला आहे.

हा निर्णय विधानसभा आणि विधानपरिषदेत काम करणाऱ्या मुख्य प्रतोद आणि प्रतोदांवर लागू होणार आहे. भाजप, शिवसेना (शिंदे गट), राष्ट्रवादी काँग्रेस, काँग्रेस आणि शिवसेना (उबाठा) या पक्षांचे मिळून एकूण १६ आमदार या निर्णयाचा लाभ घेणार आहेत.

भाजप : विधानसभा : मुख्य प्रतोद : रणधीर सावरकर, विधानपरिषद मुख्य प्रतोद : प्रसाद लाड.

शिवसेना (शिंदे गट) : विधानसभा मुख्य प्रतोद : रमेश बोरणारे, विधानपरिषद मुख्य प्रतोद : मनिषा कायंदे.

राष्ट्रवादी काँग्रेस : विधानसभा मुख्य प्रतोद : चेतन तुपे.

विरोधीपक्ष काँग्रेस : विधानपरिषद मुख्य प्रतोद : अभिजीत वंजारी, प्रतोद : राजेश राठोड. शिवसेना (उबाठा) विधानपरिषद मुख्य प्रतोद : अनिल परब, प्रतोद : सुनील शिंदे.

# लोणी काळभोर येथील अनधिकृत बांधकामांवर कारवाई करा

## अन्यथा २६ जानेवारीला आत्मदहन करणार : महिलेचा प्रशासनाला इशारा

**लोणी काळभोर, ता. १२ :** अनधिकृत प्लॉटिंग करून व्यावसायिकांनी जागेची विक्री केली आहे. प्लॉटिंग करताना व्यावसायिकांनी ओढे बुजवून अतिक्रमणे केली आहेत. सध्या त्या प्लॉटिंगमध्ये इमारतींची कामे चालू आहे. व्यावसायिकांनी गुंडगीरी करुन ७ गुंठे जमीनीवर ताबा ठोकला आहे. अनधिकृत बांधकामांवर कारवाई करण्यासाठी मागील चार वर्षापासून पाठपुरावा करत आहे. परंतु, प्रशासनाने अद्यापपर्यंत त्यांना अभय दिले. असे गंभीर आरोप करत महिलेने संबंधित प्लॉटिंग व्यावसायिकांवर आता तरी कारवाई करा. नाहीतर येत्या २६ जानेवारीला लोणी काळभोर अपर तहसील कार्यालयासमोर



आत्मदहन करणार. असा इशाराही प्रशासनाला दिला आहे.

मनीषा राजाराम कुंजीर (रा. लोणी काळभोर) असे प्रशासनाला आत्मदहनाचा इशारा देणाऱ्या महिलेचे नाव आहे. त्यांनी याबाबत पुणे जिल्हाधिकारी, पोलीस आयुक्त, प्रांताधिकारी, लोणी काळभोर अपर तहसील कार्यालय व पोलीस ठाण्यात अर्जाद्वारे तक्रार केली आहे. कुंजीर यांनी लिहिलेल्या अर्जात असे म्हटले आहे की, शिवशक्ती बिल्डकॉन भागीदारी संस्थेचे भागीदार सुनिल मारुती हरपळे, विजय वसंत बाजारे, यश आनंत घुले, दिलीप रामदास घुले, गणेश महादेव काळभोर, महेश महादेव काळभोर, सागर बाळासाहेब ढोरे, रविंद्र मारुती बाजारे, व वैशाली प्रकाश इंदलकर या सर्व प्लॉटिंग व्यावसायिकांनी लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीत ५ एकर क्षेत्रामध्ये अनधिकृत प्लॉटिंग केली आहे.

सर्व व्यावसायिकांनी अनधिकृत प्लॉटिंग केली आहे. त्यांनी ओढ्यावरच सिमेंटचे रस्ते बांधले आहेत. त्यामुळे मनीषा कुंजीर यांचे ७ गुंठे क्षेत्र पाण्याखाली जात आहे. पी.एम.आर.डी.ए यांच्या कार्यालयातून बांधकाम परवानगी नसताना, त्या जागेवर दोन ते तीन मजली असे अनेक बांधकामे चालू आहेत. त्यामुळे नैसर्गिक स्त्रोत बुजले आहेत. याबाबत प्रशासनाकडे वारंवार अर्ज करुनही अद्यापपर्यंत दखल घेतलेली नाही. दरम्यान, शिवशक्ती बिल्डकॉन भागीदारी संस्था यांच्या अनधिकृत कारभाराची प्रशासनाने कसून चौकशी करून कारवाई करावी. दहा दिवसाच्या आत न्याय द्यावा. अन्यथा लोणी काळभोर येथील अपर तहसील कार्यालयासमोर २६ जानेवारीला आत्मदहन करणार असा इशारा मनीषा कुंजीर यांनी प्रशासनाला दिला आहे.

> संबंधित महिलेने केलेल्या आरोपांमध्ये काडीमात्रसुद्धा तथ्य नाही. जाणूनबुजून मानसिक त्रास देण्याचे काम सुरु आहे. त्यांचे क्षेत्र १२ आर आहे. परंतु, शासनाच्या चुकीने सातबारा दप्तरी १८ आर क्षेत्र लागले आहे. याचाच फायदा घेण्याचे काम संबंधित महिला करत आहे. आमच्या जागेची शासकीय नियमाप्रमाणे मोजणी झाली असून आम्ही कोणतेही अतिक्रमण केलेले नाही. आमच्या जमिनीला शासनाकडून एन ए ची ऑर्डर मिळाली आहे. त्यामुळे त्यांच्या खोट्या आरोपांवर कोणीही विश्वास ठेवू नये.
> - **गणेश काळभोर,** (संचालक - शिवशक्ती बिल्डकॉन)

पुणे प्राईम न्यूज
http://www.puneprimenews.com

# १५ फेब्रुवारीपर्यंत जिल्हा परिषद, पंचायत समितीच्या निवडणूका घ्या; निवडणूक आयोगाला स्पष्ट निर्देश

**संतोष मुंडे**

नवी दिल्ली, ता. १२ : राज्यातील महापालिका निवडणुकांनंतर आता जिल्हा परिषद (झेडपी) आणि पंचायत समिती निवडणुकांकडे संपूर्ण राज्याचे लक्ष लागले आहे. या पार्श्व भूमीवर राज्य निवडणूक आयोगाला सर्वोच्च न्यायालयाकडून मोठा दिलासा मिळाला असून, जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका घेण्यासाठी न्यायालयाने १५ दिवसांची मुदतवाढ मंजूर केली आहे. त्यामुळे आता १५ फेब्रुवारी २०२६ पर्यंत या निवडणुकांचे सर्व टप्पे पूर्ण करण्याचे स्पष्ट निर्देश सर्वोच्च न्यायालयाने दिले आहेत.

यापूर्वी सर्वोच्च न्यायालयाने राज्यातील सर्व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुका ३१ जानेवारी २०२६ पर्यंत घेण्याचे आदेश राज्य निवडणूक आयोगाला दिले होते. मात्र, प्रशासकीय अडचणी, आरक्षणाशी संबंधित निर्माण झालेले प्रश्न आणि मनुष्यबळाच्या मर्यादांमुळे ही मुदत पाळणे कठीण असल्याचे आयोगाने न्यायालयाच्या निदर्शनास आणून दिले होते. त्यानुसार आयोगाने सर्वोच्च न्यायालयात विशेष अर्ज दाखल करून १० फेब्रुवारीपर्यंत मुदतवाढ देण्याची मागणी केली होती. या अर्जावर सोमवारी (१२ जानेवारी रोजी) सुनावणी झाली आणि न्यायालयाने आयोगाच्या मागणीला मान्यता दिली आहे.

सध्या राज्यातील एकूण ३२ जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांच्या निवडणुका प्रलंबित आहेत. यापैकी १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांमध्ये आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादित आहे. मात्र उर्वरित २० जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची घटनात्मक मर्यादा ओलांडली गेल्याने कायदेशीर गुंतागुंत निर्माण झाली होती. या संदर्भात अंतिम निर्णय काय होणार, याबाबत अद्याप स्पष्टता नसल्याने निवडणूक प्रक्रिया लांबणीवर पडली होती.

राज्य निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात आपले म्हणणे मांडले की, सध्या राज्यातील अनेक ठिकाणी महानगरपालिका निवडणुकांची प्रक्रिया सुरू आहे. या निवडणुकांसाठी मोठ्या प्रमाणावर प्रशासकीय अधिकारी, कर्मचारी आणि सुरक्षादल तैनात करण्यात आले आहेत. अशा परिस्थितीत त्याच भागात जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुका घेतल्यास पुरेसे मनुष्यबळ उपलब्ध करणे प्रशासनासाठी मोठे आव्हान ठरू शकते. मतदान यंत्रांच्या उपलब्धतेबाबत कोणतीही अडचण नसली तरी मनुष्यबळाची मर्यादा हा मुख्य प्रश्न असल्याचे आयोगाने स्पष्ट केले होते.

सुप्रीम कोर्टाच्या निर्णयामुळे आता राज्य निवडणूक आयोगाला निवडणूक प्रक्रिया वेगाने राबवावी लागणार आहे. तसेच राजकीय पक्षांनाही प्रचारासाठी अधिक वेळ मिळणार असल्याने आगामी काळात ग्रामीण भागातील राजकारणाचा पारा चढणार आहे. यापूर्वीही अनेक राजकीय पक्षांनी महानगरपालिका निवडणुकांच्या धावपळीत जिल्हा परिषद निवडणुकांसाठी प्रचाराचा कालावधी अपुरा असल्याची अनौपचारिक मागणी केली होती. आता न्यायालयाने दिलेल्या मुदतवाढीमुळे या पक्षांना काहीसा दिलासा मिळाला आहे.

सर्वोच्च न्यायालयाच्या या आदेशामुळे जिल्हा परिषद आणि पंचायत समिती निवडणुकांचा मार्ग मोकळा झाला असून, फेब्रुवारी महिन्यात राज्यातील ग्रामीण राजकारणाचा धुरळा उडणार असल्याचे दिसून येत आहे.

सर्वोच्च न्यायालयाने ३१ जानेवारी पर्यंत सर्व टप्प्यांतील निवडणुका घेण्यात याव्यात असे आदेश दिले होते. राज्यातील १२ जिल्हा परिषद आणि १२५ पंचायत समित्यांमध्ये आरक्षण ५० टक्क्यांच्या मर्यादित आहे. मात्र उर्वरित २० जिल्हा परिषद आणि पंचायत समित्यांमध्ये आरक्षणाची ५० टक्क्यांची घटनात्मक मर्यादा ओलांडली गेल्याने कायदेशीर पेच निर्माण झाला होता. तसेच महानगरपालिकांच्या निवडणुकांमुळे मनुष्यबळाची कमतरता निर्माण हेऊ शकते असे निवडणूक आयोगाने सर्वोच्च न्यायालयात म्हटले होते. याचा विचार करून सोमवारी (१२ जानेवारी) रोजी सर्वोच्च न्यायालयाने १५ दिवसांची मुदत वाढ दिली असून १५ फेब्रुवारी पर्यंत जिल्हा परिषद निवडणुका घेण्याचे स्पष्ट निर्देश निवडणूक आयोगाला दिले आहेत.

## संक्षिप्त



### पुण्यात फडणवीसांच्या रोड शोदरम्यान आग

**पुणे, ता. १२ :** राज्यात महापालिका निवडणुकांच्या प्रचाराने जोर धरला असून, प्रमुख नेत्यांच्या सभा आणि रोड शोमुळे राजकीय वातावरण तापले आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाशिकमधील सभेनंतर पुण्यात रोड शोसाठी उपस्थिती लावली. दरम्यान, भोसरी परिसरात त्यांच्या स्वागतासाठी उडवण्यात आलेल्या फटाक्यांमुळे आगीची घटना घडली. भोसरीत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांचा रोड शो सुरू असतानाच एका इमारतीवर फटाकेउडवताना अचानक आग लागली. घटनेची माहिती मिळताच अग्निशमन दलाच्या गाड्या तातडीने घटनास्थळी दाखल झाल्या आणि जवानांनी काही वेळातच आग आटोक्यात आणली. सुदैवाने या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नाही. मात्र, आगीमुळे संबंधित इमारतीवरील मोबाईल टॉवर पूर्णपणे जळून खाक झाल्याची माहिती समोर आली आहे. या घटनेमुळे परिसरात काही काळ गोंधळाचे आणि भीतीचे वातावरण निर्माण झाले होते. दरम्यान, रोड शोदरम्यान सुरक्षेच्या कारणास्तव पिंपरी-चिंचवड पोलिसांनी नागरिकांना रोखण्यासाठी दोर लावले होते. यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी नाराजी व्यक्त करत पोलिसांनी लावलेला दोऱ्यांचा वेढा काढण्याचे निर्देश दिल्याचंही पाहायला मिळालं.

### वॉशिंग्टन सुंदर वनडे मालिकेतून बाहेर



**मुंबई, ता. १२ :** भारत आणि न्यूझीलंड या दोन्ही संघांमध्ये वनडे सामन्यांच्या मालिकेला सुरुवात झाली आहे. मालिकेतील पहिला सामना वडोदरा येथे पार पडला. या सामन्यात भारतीय संघाने शेवटच्या षटकात दमदार विजय मिळवला आणि मालिकेत १-० ने आघाडी घेतली. पण या सामन्यादरम्यान भारतीय संघाला मोठा धक्का बसला आहे. संघातील स्टार अष्टपैलू खेळाडू वॉशिंग्टन सुंदरला दुखापत झाली आहे. त्यामुळे त्याला मैदान सोडून बाहेर जावं लागलं होतं. दरम्यान बीसीसीआयकडून वॉशिंग्टन सुंदर मालिकेतून बाहेर पडण्याची अधिकृत घोषणा करण्यात आली आहे. यासह त्याच्या बदली खेळाडूची देखील घोषणा करण्यात आली आहे.पहिल्या वनडे सामन्यादरम्यान गोलंदाजी करत असताना वॉशिंग्टन सुंदरला दुखापत झाली होती. त्यामुळे षटक टाकल्यानंतर तो मैदान सोडून बाहेर गेला. सामन्यानंतर त्याचा स्कॅन करण्यात आला. त्याची दुखापत गंभीर असल्यामुळे त्याला मालिकेतून बाहेर करण्यात आलं आहे. त्याच्या जागी दिल्लीचा स्टार खेळाडू आयुष बदोनीला स्थान देण्यात आलं आहे. बीसीसीआयने प्रेस रिलीज शेअर करून वॉशिंग्टन सुंदरच्या दुखापतीबाबत अपडेट दिली आहे. पहिल्या वनडे सामन्यादरम्यान गोलंदाजी करत असताना त्याला दुखापत झाली होती. त्यामुळे त्याला न्यूझीलंडविरुद्धच्या पुढील दोन्ही सामन्यांना मुकावं लागणार आहे.

### शहरात ४ हजार ११ मतदान केंद्रे

**पुणे, ता. १२ :** पुणे महापालिकेच्या निवडणुकीसाठी येत्या गुरुवारी (दि. १५) मतदान होणार आहे. पुणे महापालिकेमध्ये ४१ प्रभागांमधून १६५ नगरसेवक निवडून द्यायचे आहेत. मतदान प्रकियेसाठी पालिका प्रशासनाची तयारी अंतिम टप्प्यात आहे. महापालिकेच्या निवडणुकीसाठी शहरात एकूण ४ हजार ११ इतकी मतदान केंद्र आहेत. सर्वाधिक मतदान केंद्रे ही बालाजीनगर-कात्रज-आंबेगाव या ३८ क्रमांकाच्या प्रभागात एकूण १८८ मतदान केंद्रे आहेत.तर शहरात सर्वात कमी ७० मतदान केंद्रे अप्पर सुप्पर इंदिरानगर या ३९ क्रमांकाच्या प्रभागात आहेत.यंदाच्या पालिका निवडणुकीत सरासरी ९०० ते १२०० मतदारांसाठी एक मतदान केंद्र याप्रमाणे मतदान केंद्र स्थापन करण्यात आले आहे. यंदाच्या निवडणुकीत चारचा प्रभाग आहे. त्यामुळे मतदारांना चार उमेदवारांना मतदान करावे लागणार आहे.

### महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर १३ ते १६ जानेवारी ड्राय डे

**पुणे, ता. १२ :** राज्यातील २९ महानगरपालिकांच्या निवडणुकांसाठी १५ जानेवारी रोजी मतदान होत असून, या काळात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी प्रशासनाने महत्त्वाचा निर्णय घेतला आहे. निवडणूक प्रक्रिया सुरळीत आणि शांततेत पार पडावी यासाठी संबंधित शहरांमध्ये १३ जानेवारीपासून १६ जानेवारीपर्यंत ड्राय डे जाहीर करण्यात आला आहे. निवडणूक प्रचाराची सांगता होताच सर्व प्रकारच्या मद्यविक्रीवर बंदी घालण्यात येणार आहे. मंगळवार, १३ जानेवारी रोजी सायंकाळी ६ वाजल्यापासून हा आदेश लागू होईल. मतदान प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत किंवा प्रशासनाच्या पुढील सूचनेपर्यंत मद्यविक्री बंद राहणार आहे. हा निर्णय राज्यातील २९ महानगरपालिकांच्या हद्दीत लागू असेल. यामध्ये मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, नागपूर, छत्रपती संभाजीनगर, कोल्हापूर आदी प्रमुख शहरांचा समावेश आहे.

# आपल्या बापाचं काय जातं घोषणा करायला?

## मोफत मेट्रोच्या घोषणेवरुन फडणविसांचा अजित पवारांना टोला

**पुणे, ता. १२ :** पुणे आणि पिंपरी चिंचवड महापालिकेत दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसची युती झाली आहे. काही दिवसांपूर्वी दोन्ही राष्ट्रवादी काँग्रेसकडून जाहीरनामा प्रसिद्ध करण्यात आला. ज्यात महापालिकेत सत्तेत आल्यास पुणे-पिंपरी चिंचवडमधील नागरिकांना मोफत बस आणि मेट्रो प्रवास सुविधेचे आश्वासन उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिले आहे. यावरून आता मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी अजित पवारांना खोचक टोला लगावलाय.



महापालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची एक मुलाखत पार पडली. या मुलाखतीत अजित पवार यांच्या मेट्रो तिकीट मोफत करण्याबाबतच्या विधानाबद्दल त्यांना प्रश्न विचारण्यात आला.

फडणवीस म्हणाले की, मी तर आज घोषणा करणार होतो की पुण्यातून उडणाऱ्या विमानांमध्ये महिलांना तिकीट माफ केलं पाहिजे. आपल्या बापाचं काय जातं घोषणा करायला? अजित पवारांनी दिलेले हे मोफतचे आश्वासन पूर्ण होऊ शकत नाही हे पुणेकरांना माहित आहे, असे फडणवीसांनी स्पष्ट केले आहे.

याबाबत स्पष्टीकरण देत फडणवीस म्हणाले, मेट्रो ही काही एकट्या राज्याची नाही. मेट्रो केंद्राची देखील आहे. मेट्रोच्या बॉडीचे अध्यक्ष हे केंद्रिय सचिव असतात आणि एमडी हे महाराष्ट्राचे असतात. मेट्रोचे आपण फेअर फिक्सेशन करतो, त्यावेळी कायद्याने त्याची फेअर फिक्सेशन कमिटी तयार झालेली आहे आणि त्या कमिटीलाच कायद्याने दिलेले अधिकार आहेत.

माझ्या मनात आलं की तिकीट माफ करून टाकायचं, तरी मला करता येत नाही. ती फेअर फिक्सेशन कमिटी सांगते इतका खर्च आहे. समाजा जर हा खर्च तुम्ही काढणार नसाल आणि सवलत द्याची असेल तर तुम्ही कुठून पैसे देणार हे सांगा. त्यामुळे ज्या गोष्टी आपल्या हातातच नाहीत त्या गोष्टींची आश्वासने देऊ नये, असेही देवेंद्र फडणवीस म्हणाले.

# कोंढव्यात पती-पत्नीचा राहत्या घरी मृत्यू; कारण अद्याप अस्पष्ट

**पुणे, ता. १२ :** पुण्यातील कोंढवा येथील श्रद्धानगर परिसरात एका ५२ वर्षीय व्यक्ती आणि त्याच्या ४८ वर्षीय पत्नीचा त्यांच्या राहत्या घरी मृत्यू झाला आहे. शुक्रवारी सकाळी त्यांचा २३ वर्षांचा मुलगा कामावरून घरी परतला, तेव्हा ही माहिती समोर आली. रात्रपाळी संपवून घरी आलेल्या मुलाने बराच वेळ दरवाजा वाजवूनही प्रतिसाद न मिळाल्याने शेजाऱ्यांच्या मदतीने दरवाजा तोडला. घरामध्ये त्याचे आई-वडील बेशुद्ध अवस्थेत आढळले, त्यानंतर त्यांना तातडीने दवाखान्यात नेले असता डॉक्टरांनी त्यांना मृत घोषित केले.

प्रकाश मुंडे आणि ज्ञानेश्वरी मुंडे अशी या मृत दांपत्याची नावे असून प्रकाश मुंडे हे चालक म्हणून काम करत होते. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ज्ञानेश्वरी मुंडे या मागील एक वर्षापासून ब्रेन ट्यूमर या गंभीर आजाराने त्रस्त होत्या. या



आजारपणामुळे मृत्यू झाला का? की इतर काही कारण आहे. याचा तपास सध्या पोलीस करत आहेत. सध्या तरी येवलेवाडी पोलिसांनी या प्रकरणी अकस्मात मृत्यूची नोंद केली आहे.

घटनेची माहिती मिळताच वरिष्ठ पोलीस निरीक्षक अमर काळंगे यांनी पथकासह घटनास्थळाची पाहणी केली. दोघांचा मृत्यू नेमका कशामुळे झाला याचा शोध सध्या सुरु आहे. एकाच वेळी पती आणि पत्नीचा मृत्यू झाल्याने परिसरात हळहळ व्यक्त केली जात आहे. पोलीस या प्रकरणात घराती इतर सदस्यांचे जबाब नोंदवून घेत आहेत.

# लाव रे तो व्हिडिओतून राज ठाकरेंचा घणाघात; अदानी साम्राज्याचा हिशेब मांडत भाजपवर टीका

**मुंबई, ता. १२ :** महापालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवाजी पार्कवर ठाकरे बंधूंच्या संयुक्त सभेने मुंबईतील राजकीय वातावरण तापले. मनसेप्रमुख राज ठाकरे आणि शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी एकत्र येत मुंबईकरांना संबोधित केल्याने हा क्षण ऐतिहासिक ठरला. आदित्य ठाकरे यांच्या आक्रमक भाषणानंतर राज ठाकरे यांनी भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. राज ठाकरे यांनी आपल्या भाषणात भाजपवर अनेक गंभीर आरोप केले. एमआयएमसोबतची युती, निवडणुकांमध्ये पैशांचा अमर्याद वापर, बिनविरोध निवडणुकांसाठी दबाव, ड्रग्ज विक्रेत्याला नगराध्यक्षपदाचं तिकीट देणं आणि बाल लैंगिक अत्याचाराच्या आरोपीला नगरसेवक केल्याचा आरोप त्यांनी केला. सत्ताधाऱ्यांच्या कारभारावर टीका करत त्यांनी नैतिकतेचा सवाल



उपस्थित केला.

यावेळी राज ठाकरे यांनी आपल्या खास शैलीत लाव रे तो व्हिडिओ म्हणत सभास्थळी एलईडी स्क्रीनवर एक व्हिडिओ दाखवला. या व्हिडिओद्वारे त्यांनी २०१४ ते २०२४ या दहा वर्षांच्या काळात उद्योगपती गौतम अदानी यांच्या संपत्तीत झालेल्या प्रचंड वाढीचा लेखाजोखा मांडला. देशाच्या आर्थिक धोरणांमुळे काही मोजक्या उद्योगपतींचं साम्राज्य वाढत असताना सामान्य माणूस आणि मराठी माणूस कुठे उभा आहे, असा सवाल त्यांनी उपस्थित केला. दरम्यान, मुंबई मराठी माणसासाठी किती महत्त्वाची आहे, यावर भाष्य करत राज ठाकरे यांनी मुंबईवरील हक्क, विकास आणि राजकीय निर्णयांमध्ये स्थानिकांचा सहभाग का गरजेचा आहे, याकडेही लक्ष वेधले. ठाकरे बंधूंच्या या पहिल्याच संयुक्त सभेमुळे महापालिका निवडणुकीच्या राजकारणात नवे समीकरण तयार होण्याची चिन्हे दिसत आहेत.

# भाजप उमेदवार गणेश बिडकर यांना धक्काबुक्कीचा प्रयत्न

**पुणे, ता. १२ :** भारतीय जनता पक्षाचे प्रभाग क्रमांक २४ मधील उमेदवारांना शिवीगाळ करुन गणेश बिडकर यांना धक्काबुक्कीचा प्रयत्न करण्यात आल्याची घटना मंगळवार पेठेत घडली. या प्रकरणी फरासखाना पोलिसांनी पाच जणांविरुद्ध गुन्हा दाखल केला. याबाबत आदित्य दीपक कांबळे (वय-२४, रा. सदानंदनगर, मंगळवार पेठ) याने फरासखाना पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, मंगळवार पेठेतील भीममगर परिसरात रिपब्लिकन पार्टीचे पदाधिकारी नीलेश आल्हाट यांच्या वाढदिवसानिमित्त शनिवारी (१० जानेवारी) कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमास आरोपी धेंडे, भिमाले,



कांबळे, शिंदे आले होते.

भाजपचे प्रभाग क्रमांक २४ मधील उमेदवार तेथे होते. त्या वेळी आरोपींनी भाजप उमेदवारांविषयी अपशब्द उच्चारले. त्यानंतर आरोपी सागर कांबळे हा उमेदवार गणेश बिडकर यांच्या अंगावर धावून गेला. त्यांना शिवीगाळ केली. त्यावेळी उपस्थित असलेल्या कार्यकर्त्यांनी कांबळेला रोखले. या घटनेची माहिती मिळताच गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक उत्तम नामावडे, उपनिरीक्षक प्रणिल चौगले यांनी घटनास्थळी भेट दिली. उपनिरीक्षक चौगले तपास करत आहेत.

निवडणूक काळातील गैरप्रकार रोखण्यासाठी शहरात पोलिसांनी बंदोबस्त तैनात केला आहे. मतदारांवर प्रत्यक्ष किंवा अप्रत्यक्ष दबाब आणणे, निवडणूक, मतदान प्रक्रियेत अडथळा आणल्यास कावराई करण्याचा इशारा पोलीस आयुक्त अमितेश कुमार यांनी दिला आहे. कोथरूडमधील गुंड गजानन उर्फ गजा मारणेची पत्नी महापालिकेच्या निवडणुकीत उमेदवार आहे. मारणे याने काहींना दूरध्वनी केल्याची माहिती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी मारणे याला समज दिली.

# पोलीस अधिकारी असल्याचे सांगून ज्येष्ठ नागरिकाची फसवणूक

**पिंपरी चिंचवड, ता. १२ :** तळेगाव दाभाडे परिसरात सायबर फसवणुकीची एक धक्कादायक प्रकार घडला आहे. डिजिटल अरेस्टचा वापर करून सायबर चोरट्यांनी एका ७३ वर्षीय वृद्धाकडून तब्बल ३४ लाख ८० हजार २०० रुपये उकळल्याचा प्रकार उघडकीस आला आहे. पोलिस अधिकारी असल्याचे भासवून अटकेची भीती दाखवत ही फसवणूक करण्यात आली.

या प्रकरणी दिवाकर पांडुरंग पंचवाडकर (वय ७३) यांनी तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. २७ नोव्हेंबर ते २९ डिसेंबर २०२५ या कालावधीत हा प्रकार घडला. मिळालेल्या माहितीनुसार, संशयित आरोपींनी पंचवाडकर यांना व्हॉट्सपवरून फोन केला. आपण वरिष्ठ पोलीस अधिकारी असल्याचे सांगत त्यांनी विश्वास संपादन करण्याचा प्रयत्न केला.



तुमच्या नावावर मोठ्या आर्थिक फसवणुकीचा गुन्हा दाखल झाला असून लवकरच अटक होणार असल्याचे सांगून आरोपींनी त्यांच्या मनात भीती निर्माण केली. विश्वास बसावा यासाठी बनावट कागदपत्रे आणि कथित नोटिसाही व्हॉट्सपवर पाठवण्यात आल्या. तपासातून सुटका हवी असल्यास पैसे भरावे लागतील, असे सांगून आरोपींनी पंचवाडकर यांना मानसिक दबावाखाली ठेवले. यालाच डिजिटल अरेस्ट असे म्हटले जाते.

घाबरलेल्या पंचवाडकर यांनी आरोपींनी दिलेल्या वेगवेगळ्या बँक खात्यांवर टप्प्याटप्प्याने एकूण ३४ लाख ८० हजार २०० रुपये जमा केले. काही दिवसांनंतरही संशयितांकडून पैशांची मागणी सुरूच राहिल्याने आणि कोणतीही अधिकृत कारवाई होत नसल्याचे लक्षात आल्यानंतर आपली फसवणूक झाल्याची जाणीव त्यांना झाली.

यानंतर त्यांनी तातडीने तळेगाव दाभाडे पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. पोलिसांनी अज्ञात व्हॉट्सप क्रमांकधारक आणि संबंधित बँक खातेधारकांविरुद्ध गुन्हा नोंदवला आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या नावाचा गैरवापर करून ही फसवणूक करण्यात आल्याने सायबर सुरक्षेचा प्रश्न पुन्हा एकदा ऐरणीवर आला आहे. पोलिसांकडून नागरिकांना अशा कॉल्सपासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले आहे.

# पुण्यावरून उपमुख्यमंत्री अजित पवारांची देवेंद्र फडणवीस यांच्याकडून सतत कोंडी

**पुणे, ता. १२ :** पुणे महापालिकेचे विभाजन करून तीन स्वतंत्र महानगरपालिका स्थापन करण्याची घोषणा असो वा मोफत बस प्रवासाचे आश्वासन असो, मुख्यमंत्री देवेंद्र फडण्वीस हे सतत उपमुख्यमंत्री अजित पवारांचा प्रस्ताव तात्काळ धुडकावून लावतात हेच अनुभवास येते.

पुणे व पिंपरी- चिंचवड महानगरपालिका निवडणुकीच्या निमित्ताने भाजप आणि राष्ट्रवादी अजित पवार गट समोरासमोर आले आहेत. महायुतीत भाजप, शिवसेना शिंदे वा अजित पवार गट कोल्हापूर वगळता तिघेही एकत्र कुठेच लढत नाहीत. काही ठिकाणी दोन पक्षांची युती झाली आहे. भाजप आणि शिंदे



गटात कुरघोडीचे राजकारण सुरू असले तरी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी भाजपवर थेट टीका वा आरोप करण्याचे टाळले आहे. अजित पवारांनी पुण्यात मात्र भाजपवरच तोफ डागली.

पुणे व पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपच्या सत्तेच्या कार्यकाळात भ्रष्टाचार झाल्याचा आरोप केला. त्याची भाजपमधून प्रतिक्रिया उमटली. आतापर्यंत भाजपचे प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण, महसूलमंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी अजित पवारांना सुनावले होते. प्रचाराच्या अखेरच्या टप्प्यात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व अजित पवारांमध्ये तू तू मै मै झाल्याचे बघायला मिळाले. काही जणांना कंठ फुटल्याचा टोला फडणवीस यांनी अजितदादांना उद्देशून लगावला. त्यावर नऊ वर्षांनी निवडणूक जाहीर झाल्याने कंठ फुटल्याचे प्रत्युत्तर अजित पवारांनी मुख्यमंत्र्यांना दिले.

पुण्याच्या प्रचारावरून अजित पवारांचा संयम सुटल्याची टीका फडण्वीस यांनी मुलाखतीत केली. महायुतीत वेगळे लढताना परस्परांवर टीकाटिप्पणी करू नये, असे ठरले होते. पण अजित पवारांनी ते पाळले नाही, असेही फडणवीस यांनी सुनावले. अजित पवारांनी जाहीरनाम्यात बससेवा व मेट्रोचा प्रवास मोफत देण्याचे आश्वासन दिले आहे. त्याचीही फडणवीस यांनी खिल्ली उडवली. मी पण पुण्यातून उडणाऱ्या विमानांमध्ये महिलांना निम्मे भाडे असे आश्वासन देणार होतो. आश्वासन द्यायला काय लागते, असे विधान करीत अजित पवारांच्या आश्वासनाची पार खिल्ली उडवली. काही महिन्यांपूर्वी अजित पवारांनी पुण्याचे विभाजन करून तीन महानगरपालिका करण्याची घोषणा करताच लगेचच फडण्वीस यांनी ही योजनाही धुडकावून लावली होती.

पुण्याची सूत्रे अजित पवारांना स्वत:कडे हवी आहेत. भाजप अजित पवारांचे पुण्यातील वर्चस्व मान्य करायला तयार नाही. त्यातून हा वाद उदभवला आहे. पुण्याच्या आसपासच्या परिसरात भाजपला पक्ष वाढवायचा आहे. यापूर्वी पश्चिम महाराष्ट्रात भाजपवर मर्यादा होत्या. त्यासाठी अन्य पक्षातील नेत्यांना बरोबर घेऊन पक्ष वाढीचे भाजपचे प्रयत्न सुरू आहेत. यातूनच अजित पवार आणि भाजपमध्ये वर्चस्वाचा वाद आहे. पुणे वा पिंपरी चिंचवड ताब्यात आल्यास राजकीय ताकद वाढते हे लक्षात घेऊनच अजित पवारांनी जोर लावला आहे.

# जिजाऊंचे 'शौर्य' व स्वामी विवेकानंदांचा 'आत्मविश्वास' काळाची गरज : डॉ. निकम




**लोणी काळभोर, ता. १२** : राष्ट्रमाता जिजाऊ यांनी छत्रपती शिवाजी महाराजांना घडविले. त्यांना लढण्याची प्रेरणा दिल्या मुळेच महाराष्ट्राचे सुराज्य झाले. फक्त राज्य घडविणे एवढेच त्यांचे ध्येय नव्हते तर शौर्याची आणि संस्काराची मूर्तीमंत देवी म्हणून राष्ट्रमाता जिजाऊ कडे पाहिले जाते. तर स्वामी विवेकानंद हे युवकांचे प्रेरणास्थान असून जगाला विश्वबंधुत्वाची संकल्पना देणारे युगपुरुष आहे. आजही त्यांच्यात असलेला आत्मविश्वास प्रत्येक तरुणांनी आत्मसात केल्यास देशाचा विकास होईल. असे प्रतिपादन प्रा. डॉ. संभाजी निकम यांनी केले आहे.

लोणी काळभोर (ता. हवेली) येथील समाजभूषण गणपतराव काळभोर महाविद्यालयात राष्ट्रमाता जिजाऊ व स्वामी विवेकानंद जयंती साजरी करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना वरील प्रतिपादन डॉ. संभाजी निकम यांनी केले. यावेळी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर, प्रा. डॉ. शिवाजी गायकवाड, डॉ. स्नेहा बुरगुल, शिक्षक, शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

यावेळी बोलताना प्राचार्य डॉ. अंबादास मंजुळकर म्हणाले की, जिजाऊंनी स्वराज्याचे स्वप्न दिले, तर स्वामी विवेकानंदांनी भारताला जागतिक स्तरावर आत्मसन्मान मिळवून दिला. या दोन्ही विभूतींचे विचार आजही तरुणांसाठी दीपस्तंभ आहेत. दरम्यान, स्वामी विवेकानंद यांची जयंती महाविद्यालयात दरवर्षी विवेकानंद जयंती सप्ताह म्हणून साजरा केला जातो. यावर्षी १२ ते १९ जानेवारी २०२६ या कालावधीत साजरी करण्यात येणार आहे. या सप्ताहात सांस्कृतिक विभागाकडून निबंध लेखन, वक्तृत्व, चित्रकला, तर क्रीडा विभागाकडून १००, २०० मीटर धावणे, थाळी फेक्र, गोळा फेक, टेबल टेनिस, कॅरम चेस इत्यादी विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले आहे.

# धनंजय मुंडे भाजपात प्रवेश करणार? राजकीय वर्तुळात चर्चांना उधाण

**मुंबई, ता. १२** : राष्ट्रवादी काँग्रेसचे नेते आणि आमदार धनंजय मुंडे सध्या राजकीय वर्तुळात चर्चेचा विषय ठरत आहेत. मस्साजोगचे सरपंच संतोष देशमुख यांच्या हत्याप्रकरणात मुंडेंचे निकटवर्तीय वाल्मीक कराड हा मुख्य सूत्रधार असल्याचे निष्पन्न झाल्यानंतर मुंडेंना मंत्रिपदाचा राजीनामा द्यावा लागला होता. त्यानंतर त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा आलेख काहीसा खालावल्याचे चित्र दिसत आहे.

राष्ट्रवादीकडून त्यांच्यावर स्टार प्रचारकाची जबाबदारी देण्यात आली असली, तरी पक्षाच्या प्रमुख कार्यक्रमांपासून ते अलिप्त राहात असल्याचे जाणवत आहे. अशा परिस्थितीत, गेल्या काही दिवसांपासून धनंजय मुंडे भाजपमध्ये प्रवेश करणार असल्याच्या चर्चांना जोर आला असून, त्यामागे तीन महत्त्वाच्या घडामोडी कारणीभूत ठरत आहेत.

काही दिवसांपूर्वी धनंजय मुंडे यांनी नवी दिल्ली येथे केंद्रीय गृहमंत्री आणि भाजप नेते अमित शाह यांची भेट घेतली. या भेटीत संतोष देशमुख हत्या प्रकरणात माझा कोणताही सहभाग नसल्याचे सांगत पुन्हा मंत्रिमंडळात संधी देण्याची मागणी केल्याची चर्चा राजकीय वर्तुळात रंगली. राष्ट्रवादीचे अध्यक्ष अजित पवार कार्यरत असताना थेट भाजपच्या वरिष्ठ नेत्यांची भेट घेतल्याने मुंडेंच्या भूमिकेबाबत तर्कवितर्कांना उधाण आले.

धनंजय मुंडे यांनी भाजप सोडून राष्ट्रवादीत प्रवेश केल्यानंतर बीड जिल्ह्यात ते पक्षाचे प्रमुख नेते मानले जात होते. मात्र अलीकडच्या काळात अजित पवार यांच्या अनेक जाहीर सभा आणि दौऱ्यांमध्ये मुंडे



अनुपस्थित असल्याचे दिसून आले आहे. नुकत्याच झालेल्या बीड दौऱ्यात अजित पवारांसोबत विविध पक्षांचे नेते उपस्थित असताना, कौटुंबिक कारण देत धनंजय मुंडे मात्र या दौऱ्यापासून दूर राहिले. यामुळे त्यांच्यात आणि अजित पवारांमध्ये अंतर वाढल्याच्या चर्चांना चालना मिळाली आहे.

संत वामनभाऊ यांच्या सुवर्णमहोत्सवी पुण्यतिथीनिमित्त गहिनीनाथगड येथे झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि धनंजय मुंडे एकाच व्यासपीठावर दिसले. यावेळी फडणवीसांनी माझे मित्र असा उल्लेख करत मुंडेंचे नाव घेतल्याने चर्चांना अधिक बळ मिळाले. त्यानंतर दोघांनी एकत्र हेलिकॉप्टर प्रवास केल्याचेही समोर आले.

मुंडेंच्या भाजप प्रवेशाच्या चर्चा सुरू असल्या, तरी हा निर्णय लगेच होणे सोपे नाही. कारण ते सध्या राष्ट्रवादीच्या तिकिटावर निवडून आलेले आमदार आहेत. कार्यकाळ संपण्यापूर्वी पक्षांतर करायचे असल्यास त्यांना आमदारकीचा राजीनामा देऊन पुन्हा निवडणूक लढवावी लागेल. त्यामुळे पोटनिवडणुकीचा धोका ते पत्करतील का, याबाबत साशंकता व्यक्त केली जात आहे.

दरम्यान, धनंजय मुंडे यांनी भाजप प्रवेशाबाबत अद्याप कोणतीही अधिकृत भूमिका मांडलेली नाही. मात्र वाढत्या चर्चांमुळे त्यांच्या पुढील राजकीय वाटचालीकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# मुंबई लुटण्याचा भाजपाचा डाव उधळून लावू; उद्धव ठाकरेंचा जोरदार प्रहार

**मुंबई, ता. १२** : मातृभाषेचे आणि मातीचे प्रेम रक्तात असावे लागते. आमच्या डोळ्यादेखत जर कुणी मुंबईचे लचके तोडणार असेल, तर आम्ही ठाकरे गप्प बसणार नाही. आम्ही आमच्यातील सर्व वाद गाडून आता मराठी माणसाच्या हितासाठी एक ताकद म्हणून उभे ठाकलो आहोत, अशा शब्दांत शिवसेना पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भाजपवर जोरदार प्रहार केला. मुंबई महानगरपालिका निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर शिवाजी पार्क येथे आयोजित सभेत ते बोलत होते. यावेळी त्यांनी भाजपचे हिंदुत्व, अदानींचे हितसंबंध आणि मुंबईतील प्रदूषणाच्या मुद्द्यावरून राज्य सरकारला धारेवर धरले.

संयुक्त महाराष्ट्राच्या चळवळीचा संदर्भ देत उद्धव ठाकरे म्हणाले की,



ज्यावेळी आचार्य अत्रे, एस. एम. जोशी आणि प्रबोधनकार ठाकरे लढत होते, तेव्हा जनसंघ कुठेच नव्हता. जनसंघ केवळ घरं पेटवून स्वतःच्या पोळ्या भाजणारा पक्ष आहे. मुंबई महाराष्ट्राला मिळवून देण्यासाठी सर्व पक्ष एकत्र आले होते, मात्र जनसंघ त्यात सर्वात शेवटी सामील झाला आणि सर्वात आधी बाहेर पडला, असा टोला त्यांनी लगावला. भाजपच्या हिंदुत्वावर शंका उपस्थित करताना ठाकरे म्हणाले की, भाजपचे हिंदुत्व आणि देशप्रेम हे निव्वळ ढोंग आहे. पहलगाम हल्ल्यानंतर हे लोक ऑपरेशन सिंदूरची भाषा करतात आणि दुसरीकडे अमित शहा यांचे सुपुत्र पाकिस्तानसोबत क्रिकेटचे सामने खेळवतात; हेच का तुमचे हिंदुत्व? असा सवाल त्यांनी विचारला.


मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी केलेल्या टीकेला ही त्यांनी प्रत्युत्तर दिले. ते म्हणाले की, देवेंद्रजी, तुम्ही मला विकासावर बोलल्याचे दाखवून एक लाख रुपये देण्याचे आव्हान दिले होते, पण मला चोराचा पैसा नको. मी तुम्हाला आव्हान देतो की, वर्गाच्या मॉनिटरची निवडणूक असली तरी हिंदू-मुस्लिम हा मुद्दा न आणता केलेले तुमचे एखादे भाषण दाखवा, मी तुम्हाला एक लाख रुपये देतो. मुंबईच्या आर्थिक स्थितीवर भाष्य करताना त्यांनी आरोप केला की, शिवसेनेच्या काळात महापालिकेच्या ज्या ठेवी हजार कोटींपर्यंत होत्या, त्या आज हजार कोटींवर आल्या आहेत. भाजपने आणि गद्दारांनी मिळून लाख कोटींचा घोटाळा केल्याचा आरोप करत, मुंबई आता अदानींच्या घशात घालण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

मुंबईतील वाढत्या प्रदूषणाचे मूळ अनिर्बंध बांधकामात असून, या कामांसाठी वापरले जाणारे टक्के सिमेंट हे अदानींच्या कंपन्यांकडूनच येते, याकडेही त्यांनी लक्ष वेधले. शेवटी, तुम्ही मोदींचे केवळ बँडवाले आहात, आमचा ब्रँड तुम्ही कधीच संपवू शकणार नाही, असे ठणकावून सांगतानाच ठाकरे आणि पवार ही दोन नावे पुसून मराठी माणसाला हतबल करण्याचा भाजपचा डाव आम्ही यशस्वी होऊ देणार नाही, असा निर्धार उद्धव ठाकरे यांनी व्यक्त केला.

# पिंपरीत राष्ट्रवादी उमेदवाराच्या घरावर हल्ला; आठ जणांविरोधात गुन्हा दाखल

**पिंपरी, ता. १२** : पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या प्रभाग क्रमांक २१, पिंपरीगाव परिसरात राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवाराच्या घरावर हल्ला झाल्याची खळबळजनक घटना समोर आली आहे. भाजप उमेदवाराच्या समर्थकांनी शिवीगाळ, धमक्या देत घरात घुसून कुटुंबीयांवर हल्ला केल्याचा आरोप करण्यात आला असून, या प्रकरणी पिंपरी पोलीस ठाण्यात आठ जणांविरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

याप्रकरणी ३३ वर्षीय डॉक्टर महिलेने फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, सोमवारी रात्री आरोपी टोळक्याने घरासमोर येत आमच्या विरोधात उमेदवार उभे करण्याचे धाडस का केले असे म्हणत शिवीगाळ




केली. तसेच तुम्हाला जीवे मारून टाकू अशी धमकी देत घरात जबरदस्तीने प्रवेश केला. यावेळी चुलत सासऱ्यांना अश्लील शिवीगाळ करण्यात आली, तर सासूला ढकलून दिल्याने त्या खाली पडून जखमी झाल्या. त्यांच्या डोक्याला व हाताला मार लागल्याचे फिर्यादीत नमूद आहे.

आरोपींनी चुलत दिराला लाथा-बुक्क्यांनी मारहाण केली. तसेच घरासमोरील पाण्याचे जार इतर घरांवर आणि रस्त्यावर फेकून दिले, दुचाकी ढकलून नुकसान केले. शिवीगाळ करत पाण्याचे जार घेऊन कुटुंबीयांवर धावून गेल्याचा आरोपही करण्यात आला आहे. संबंधित आरोपी हे विरोधी भाजप उमेदवाराचे समर्थक व कार्यकर्ते असल्याचा दावा फिर्यादीने केला आहे. घटनेचे व्हिडिओ पुरावे पोलिसांकडे सादर करण्यात आले असून, त्याच्या आधारे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांकडून पुढील तपास सुरू असून, घटनेनंतर परिसरात तणावपूर्ण शांतता आहे.

दरम्यान, प्रभाग क्रमांक २१ संवेदनशील घोषित करण्याची मागणी राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवारांनी यापूर्वीच केली होती. महापालिका निवडणुकीच्या मतदानाला अवघे काही दिवस शिल्लक असतानाच ही घटना घडल्याने, मतदान प्रक्रिया शांततेत पार पाडण्याचे मोठे आव्हान पोलिस प्रशासनासमोर उभे राहिले आहे.




Printed & Published By Janardan Gowardhan Dandge on behalf of Pune Prime News Network and printed at SHREE SAMARTH PRINTERS, 686, SHIVGANGA CHAMBERS, SHOP NO. G1, BUDHWAR PETH PUNE, 411002, Maharashtra. and publishded at Shop no 201, Sunrise Complex, Pune-Solapur Road. loni kalbhor(station), Tal.: Haveli Dist.: Pune-412201 Maharashtra) Editor- Janardhan Dandge (Mo. No. 9922232222).

मुद्रक, प्रकाशक व संपादक : जनार्दन गोवर्धन दांडगे. हे दैनिक पुणे प्राईम न्यूज नेटवर्क करीता मुद्रक आणि प्रकाशक जनार्दन गोवर्धन दांडगे यांनी श्री स्वामी समर्थ प्रिंटर्स, ६८६, शिवगंगा चेंबर्स, शॉप नं. जी १, बुधवार पेठ, पुणे - ४११००२ महाराष्ट्र येथे मुद्रित केले व पुणे प्राईम न्यूज नेटवर्क, शॉप नं २०१, सनराईज कॉम्प्लेक्स, पुणे सोलापूर रोड, लोणी काळभोर (स्टेशन), ता. हवेली, जि. पुणे- ४१२२०१ येथे प्रकाशित केले. 'पुणे प्राईम न्यूज' मधील लेखांचे हक्क राखून ठेवले आहेत. पुणे प्राईम न्यूज हे 'पुणे प्राईम न्यूज नेटवर्क'चे व्यापारचिन्ह आहे. (पीआरबी कायद्यानुसार जबाबदारी), दूरध्वनी : ९९२२२३२२२२, E Mail: puneprimenewsgmail.com.

प्राईम लाईफ



## कडधान्य खाण्याचे अगणित फायदे काय होतात, वाचा सविस्तर


**पुणे, ता. १२ :** आपल्याकडे अन्न हे पूर्णब्रम्ह म्हणून ओळखले जाते. म्हणूनच आहाराच्या बाबतीत आपल्या सवयी या पूर्वापार चालत आलेल्या आहेत. पूर्वीच्या काळी घरातील जुनी जाणती माणसं सकाळी रिकाम्या पोटी भिजवलेले हरभरे म्हणजेच चणे खाण्यास सांगायचे. ही एक साधी पण खूप फायदेशीर सवय होती. भिजवलेल्या चण्यांमध्ये प्रथिने, फायबर, जीवनसत्त्वे आणि खनिजे मुबलक प्रमाणात आढळतात, ज्यामुळे शरीर ऊर्जावान आणि निरोगी राहते. भिजवलेले हरभरा खाल्ल्याने शरीराला संपूर्ण पोषण मिळते म्हणूनच त्याला सुपरफुड असंही म्हटलं जातं.रिकाम्या पोटी भिजवलेले चणे खाल्यामुळे, पचनक्रिया म जबूत होते. तसेच बद्धकोष्ठतेच्या समस्येपासून मुक्ती मिळते आणि पोटही स्वच्छ होते. भिजवलेल्या चण्यामध्ये कार्बोहायड्रेट्स आणि प्रथिनांचा चांगला स्रोत आहे, जो दिवसभर शरीराला ऊर्जावान ठेवतो. हे विशेषतः व्यायाम करणाऱ्या किंवा शारीरिक श्रम करणाऱ्यांसाठी फायदेशीर आहे. चण्यामध्ये कमी ग्लायसेमिक इंडेक्स असतो. त्यामुळे रक्तातील साखरेची पातळी नियंत्रित करण्यास मदत होते. म्हणूनच भिजवलेले चणे मधुमेही रुग्णांसाठी हा एक चांगला आहार मानला जातो. चण्यामध्ये कॅल्शियम, मॅग्नेशियम आणि फॉस्फरस असते, जे हाडे मजबूत करण्यास मदत करतात. भिजवलेले चणे नियमित खाल्ल्याने हाडांची कमजोरी दूर होते. भिजवलेल्या चण्यात अँटीऑक्सिडंट्स आणि आवश्यक पोषक घटक असतात, जे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढवतात. यामुळे आजार दूर राहतात आणि शरीर अधिक निरोगी राहते. चण्यामध्ये प्रथिने, जस्त आणि इतर खनिजे असतात, जे केस आणि त्वचेचे आरोग्य राखतात. हे त्वचेला नैसर्गिक चमक देण्यास आणि केसांना मजबूत करण्यास मदत करते. रात्रभर हरभरा पाण्यात भिजत ठेवा आणि सकाळी रिकाम्या पोटी मूठभर हरभरा खा.तुम्हाला कोणताही आजार किंवा इतर कोणतीही समस्या असेल तर चणे खाण्यापूर्वी एकदा डॉक्टरांचा सल्ला घ्या.

# शेतात काम करताना विहिरीत पडून महिलेचा मृत्यू; गावडदरा परिसरात पसरली शोककळा

**विशाल शिंदे**

पुणे, ता. १२ : हवेली तालुक्यातील गावडदरा परिसरात शेतात काम करत असताना विहिरीत पडून एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाल्याची घटना घडली. उज्वला शत्रुघन वावळ (वय ४०, रा. श्रीराम नगर, ता. हवेली, जि. पुणे) असे मृत महिलेचे नाव आहे. या घटनेमुळे परिसरात शोककळा पसरली आहे.

प्राप्त माहितीनुसार, उज्वला वावळ या नेहमीप्रमाणे शेतात काम करत होत्या. दुपारच्या सुमारास त्या विहिरीवर पाणी भरण्यासाठी गेल्या असता पाय घसरून त्या थेट विहिरीत कोसळल्या. विहीर खोल असून पाण्याची पातळी जास्त असल्याने त्या पाण्यात बुडाल्या. बराच वेळ झाल्यानंतरही त्या घरी न परतल्याने कुटुंबीयांनी व ग्रामस्थांनी शोध सुरू केला.



घटनेची माहिती मिळताच पुणे आपत्ती व्यवस्थापन, हवेली-वेल्हा आपत्ती व्यवस्थापन, भोईराज आपत्ती व्यवस्थापन (शिरवळ), पीएमआरडीए अग्निशमन दल तसेच पुणे आपत्ती प्रतिसाद पथक तातडीने घटनास्थळी दाखल झाले. सर्व यंत्रणांनी परस्पर समन्वय साधत संयुक्त शोध व बचाव मोहीम हाती घेतली.

विहिरीतील पाणी खोल व गढूळ असल्याने शोधकार्य कठीण झाले. अशा परिस्थितीत ऑक्सिजन मास्कच्या सहाय्याने स्कुबा पद्धतीने पाण्याखाली शोध घेण्याचा निर्णय घेण्यात आला. प्रशिक्षित जवानांनी पाण्यात उतरून पद्धतशीर शोध सुरू केला. सुमारे चार ते पाच तासांच्या अथक प्रयत्नांनंतर पाण्याखाली मृतदेह आढळून आला आणि तो बाहेर काढण्यात यश आले.

या मोहिमेत हवेली आपत्ती व्यवस्थापन प्रमुख तानाजी भोसले यांच्यासह संजय चोरगे पाटील, उत्तम पिसाळ, प्रतीक महामुनी, संतोष भगत, योगेश गोपी व विक्रम हिरामणे यांनी महत्त्वाची भूमिका बजावली. पीएमआरडीए अग्निशमन दलातील वाहन चालक प्रेमसागर राठोड तसेच अग्निशमन विमोचक सुनिल चामे व निक्त चव्हाण यांनी प्रत्यक्ष शोधकार्यात सहभाग घेतला.

दरम्यान, पुणे आपत्ती प्रतिसाद पथकातील वाहन चालक अनिल शिंदे, जवान अजय सावंत व विशाल माळी यांनी पाण्यात उतरून मृतदेह बाहेर काढण्यात मोलाचे योगदान दिले. विविध यंत्रणांचा समन्वय, आधुनिक उपकरणांचा वापर आणि प्रशिक्षित मनुष्यबळामुळे ही अवघड मोहीम यशस्वीरीत्या पार पडली. या घटनेची नोंद पतीच्या तक्रारीवरून करण्यात आली असून पुढील तपास राजगड पोलीस ठाणे करत आहे. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाइकांच्या ताब्यात देण्यात आला. या घटनेमुळे वावळ कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला असून गावडदरा परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

## पुण्यात सोशल मीडियाच्या माध्यमातून एका तरुणीची बदनामी

**पुणे, ता. १२ :** पुण्यातील भारती विद्यापीठ पोलीस ठाण्याच्या हद्दीत सोशल मीडियाच्या माध्यमातून एका तरुणीची बदनामी केल्याची घटना समोर आली आहे. इन्स्टाग्राम वर सक्रिय असलेल्या एका २७ वर्षीय तरुणीचा व्हिडिओ तिच्या संमतीशिवाय डाऊनलोड करून त्यावर अश्लील मजकूर लिहिल्याप्रकरणी अज्ञातावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. एका व्यक्तीने व्हिडिओ एडिट करून स्वतःच्या इन्स्टाग्राम खात्यावरून प्रसारित केल्याचे उघड झाले आहे. या घटनेमुळे पीडित तरुणीची सामाजिक बदनामी झाली असून तिने तात्काळ पोलिसांत तक्रार दिली. भारती विद्यापीठ पोलिसांनी या प्रकरणी विनयभंग आणि माहिती तंत्रज्ञान कायद्याच्या विविध कलमांनुसार गुन्हा नोंदवला आहे. सायबर पोलीस सध्या डिजिटल पुराव्यांच्या आधारे संबंधित इन्स्टाग्राम खात्याचा आणि आरोपीचा शोध घेत आहेत.

# दादांचा संयम ढळलाय, १५ तारखेनंतर ते बोलणार नाहीत; फडणवीसांची टोलेबाजी

**पुणे, ता. १२ :** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची अभिनेत्री गिरीजा ओक हिने संवाद पुणेकरांशी या कार्यक्रमात मुलाखत घेतली. या मुलाखतीत देवेंद्र फडणवीस यांनी पुणे, पिंपरी चिंचवड आणि महापालिका निवडणुकीसंदर्भातील विविध मुद्द्यांवर आपली भूमिका मांडली.

यावेळी बोलताना देवेंद्र फडणवीस म्हणाले की, देवाभाऊ काही म्हणत नाही, देवाभाऊचं काम बोलतं. अजित दादा म्हणतात माझं काम बोलतं, पण या निवडणुकीत सुरुवातीलाच लक्षात आलं होतं की पुणे आणि पिंपरी चिंचवडमध्ये एकत्र लढता येणार नाही. दोन्ही ठिकाणी भक्कम पक्ष आहेत आणि आम्ही नंबर एकचा पक्ष आहोत, असं त्यांनी सांगितलं. पुढे ते म्हणाले की, आम्ही आधीच ठरवलं होतं की वेगवेगळं लढायचं आणि जिथे आपण लढतोय तिथे मैत्रीपूर्ण लढत समजायची. मी आतापर्यंत संयम पाळला आहे, मात्र निवडणुकीतील स्थिती पाहता दादांचा संयम थोडा ढळलेला दिसतोय. १५ तारखेनंतर ते काही बोलणार नाहीत, असंही त्यांनी सांगितलं.



राज ठाकरे आणि उद्धव ठाकरे एकत्र येण्याबाबत बोलताना फडणवीस म्हणाले की, कोणताही परिवार एकत्र येत असेल तर मला आनंद आहे. राज ठाकरे यांनी मला क्रेडिट दिलं याचा आनंद आहे. बाळासाहेब ठाकरे यांचं स्वप्न होतं ते दोघे एकत्र येत असतील तर त्याचा मला आनंद आहे.

अजित पवारांच्या मोफत मेट्रो प्रवासाच्या घोषणेवर टोला लगावत फडणवीस म्हणाले की, पुण्यातून जितकी विमानं उडतात तेवढ्या विमानांमध्ये महिलांना मोफत तिकीट देण्याची घोषणा करायला हवी होती. लोकांचा विश्वास बसेल अशाच घोषणा केल्या पाहिजेत. मेट्रो एकट्या राज्याची नसते, असंही त्यांनी स्पष्ट केलं.

पुणेकर कर भरणारे नागरिक आहेत. त्यांना चांगली मेट्रो आणि बस सेवा हवी आहे. पुण्यातील टेकड्या टिकल्या पाहिजेत आणि तिथे झालेलं अतिक्रमण हटवून पुनर्वसन झालं पाहिजे, असं मत त्यांनी मांडलं. पुण्याचा पाणी प्रश्न लवकरच सुटेल आणि भविष्यासाठी नवीन जलस्रोत निर्माण करावे लागतील, असंही फडणवीस यांनी सांगितलं.

## बंटी पाटील मरेपर्यंत काँग्रेसमध्ये होता अशी ओळ लिहिली जाईल

### आमदार सतेज पाटील यांची पक्ष बदलणाऱ्यांना चपराक

**कोल्हापूर, ता. १२ :** सत्ताधाऱ्यांकडून पक्षफोडीच्या सत्रामुळे आज कोण कुठे जातोय, कुणालाही समजत नाही. कोण कारवाई टाळण्यासाठी, तर कोण विविध लाभांच्या स्वार्थासाठी पक्षनिष्ठा सपशेल पायदळी तुडवत आहेत. या पार्श्वभूमीवर काँगेसचे विधिमंडळातील गटनेते आमदार सतेज पाटील यांनी अशा पक्ष बदलणाऱ्यांवर सणसणीत चपराक लगावली आहे. तीस वर्षांनी जेव्हा इतिहास लिहिला जाईल, तेव्हा बंटी पाटील मरेपर्यंत काँग्रेसमध्ये होता, या चार ओळी माझ्यासाठी लिहिल्या जातील, असे भावनिक आवाहन त्यांनी केले. विशेष म्हणजे राजकीय हाडवैरी असलेल्या आणि अनेक पक्षांतून सध्या भाजपमध्ये असलेले खासदार धनंजय महाडिक यांच्या निवासस्थानापासून हाकेच्या अंतरावर झालेल्या रुईकर



कॉलनी परिसरात झालेल्या एका सभेत त्यांनी हे वक्तव्य केल्याने, त्यांचा नेमका रोख कोणावर, हे लपून राहिले नसले, तरी याची राजकीय वर्तुळात चांगलीच चर्चा होऊ लागली आहे. कोल्हापूर महापालिकेसाठी आपण ८१ कार्यकर्त्यांना संधी दिली आहे. माझ्या मुलाला वा घरातल्या सदस्याला उमेदवारी द्या म्हणून कोणत्याही पक्षश्रेष्ठीकडे चर्चा केलेली नाही. काही नेत्यांच्या मुलांनी उमेदवारी अर्ज भरून तो माघारीही घेतला, असा टोलाही आमदार सतेज पाटील यांनी धनंजय महाडिक यांना लगावला.

## उपसरपंचांच्या पत्नीचा आढळला मृतदेह

**कोल्हापूर, ता. १२ :** कोल्हापूर जिल्ह्यातील आटेगाव परिसरातील दुधगंगा नदीच्या उजव्या कालव्यात पडून एका महिलेचा दुर्दैवी मृत्यू झाला आहे. या घटनेमुळे संपूर्ण गावात शोककळा पसरली असून एका कुटुंबावर अचानक दुःखाचा डोंगर कोसळला आहे.



मिळालेल्या माहितीनुसार, आटेगाव येथील अनुराधा नामदेव कांबळे (वय ३८) या शनिवारी दुपारी घरातील कपडे धुण्यासाठी दुधगंगा नदीच्या उजव्या कालव्यावर गेल्या होत्या. साधारण साडेतीन ते चार वाजण्याच्या सुमारास त्या कालव्याच्या काठावर काम करत असताना त्यांचा अचानक तोल गेला. पाण्याचा प्रवाह वेगवान असल्याने त्या पाण्यात वाहून गेल्याचा अंदाज व्यक्त केला जात आहे. बराच वेळ झाला तरी अनुराधा घरी न परतल्याने त्यांचे पती नामदेव कांबळे आणि इतर नातेवाईकांनी त्यांचा शोध सुरू केला. शोध घेत असताना कालव्याच्या काठावर त्यांच्या चप्पला आणि भिजलेल्या गोधड्या आढळून आल्या. यामुळे कुटुंबीयांच्या काळजात धस्स झाले आणि त्यांनी तातडीने पोलिसांना माहिती दिली.

घटनेची माहिती मिळताच राधानगरी पोलिसांनी स्थानिक ग्रामस्थांच्या मदतीने शोध मोहीम सुरू केली. शनिवारी अंधार झाल्यामुळे शोध कार्यात अडथळे आले. रविवारी सकाळी पुन्हा शोध मोहीम राबवण्यात आली. अखेर सरवडे परिसरातील कालव्याच्या झुडुपात अनुराधा कांबळे यांचा मृतदेह अडकलेल्या अवस्थेत आढळून आला. मृतदेह सोळांकुर ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदनासाठी पाठवण्यात आला. शवविच्छेदनानंतर मृतदेह नातेवाईकांच्या ताब्यात देण्यात आला असून राधानगरी पोलीस ठाण्यात या घटनेची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, अनुराधा कांबळे यांचे पती नामदेव कांबळे हे गावाचे उपसरपंच आहेत. त्यांच्या पश्चात एक मुलगा आणि एक मुलगी असा परिवार आहे. आईच्या अचानक जाण्याने कुटुंबीयांचा आक्रोश पाहून अंत्यसंस्कारावेळी उपस्थितांचे डोळे पाणावले. प्रशासनाकडून कालव्याच्या परिसरात काम करताना नागरिकांनी विशेष काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे.

## जमिनीची ११ महत्त्वाची कागदपत्रे मिळणार घरबसल्या

**पुणे, ता. १२ :** महाराष्ट्र शासनाने जमीन व्यवहारातील पारदर्शकता वाढवण्यासाठी ई-हक्क ही नवीन डिजिटल प्रणाली सुरू केली आहे. या सुविधेमुळे आता सातबारा उताऱ्यातील वारस नोंद, फेरफार किंवा बोजा चढवणे यांसारख्या कामांसाठी शेतकऱ्यांना वारंवार तलाठी कार्यालयात जाण्याची गरज भासणार नाही. या प्रणालीद्वारे एकूण ११ महत्त्वाच्या सेवा आता ऑनलाईन उपलब्ध झाल्या आहेत. नागरिक स्वतः किंवा महा ई-सेवा केंद्रातून या कामांसाठी डिजिटल पद्धतीने अर्ज करू शकतात. यामुळे मानवी हस्तक्षेप कमी होऊन कामात गतिमानता येणार आहे.

यापूर्वी जमिनीच्या कामांसाठी तलाठी कार्यालयांचे फेरे मारताना नागरिकांचा मोठा वेळ आणि पैसा वाया जात होता. आता ई-हक्क प्रणालीमध्ये अर्ज केल्यापासून त्याची नोंद होईपर्यंतची सर्व प्रक्रिया संगणकावर होणार आहे. यामध्ये जमीन खरेदी-विक्रीची नोंद, कौटुंबिक वाटणी, ई-करार आणि मृत व्यक्तीचे नाव कमी करणे अशा सुविधांचा समावेश आहे. विशेष म्हणजे अर्जदाराला आपल्या अर्जाची स्थिती ऑनलाईन पाहता येणार असल्याने प्रक्रियेत पारदर्शकता राहणार आहे.



यासोबतच शासनाने ग्रीस्टॅक योजनेद्वारे शेतकऱ्यांसाठी युनिक फार्मर आयडी देण्याचे कामही सुरू केले आहे. या विशेष ओळख क्रमांकामुळे कर्ज, विमा किंवा इतर सरकारी योजनांचा लाभ घेताना वारंवार कागदपत्रे सादर करावी लागणार नाहीत. या युनिक आयडीमध्ये शेतकऱ्याची सर्व माहिती साठवली जाणार असल्याने प्रशासकीय कामाचा ताण कमी होईल. शासनाच्या या निर्णयामुळे ग्रामीण भागातील महसूल प्रशासन अधिक लोकाभिमुख होण्यास मदत होणार आहे.

## ताम्हिणी घाटात आढळला रक्ताच्या थारोळ्यात पडलेला अनोळखी मृतदेह

**पुणे, ता. १२ :** ताम्हिणी घाटामध्ये एका तरुणाची हत्या झाल्याची घटना उघडकीस आली आहे. साधारण २५ ते ३० वर्षे वयोगटातील या तरुणाचा मृतदेह माणगाव-पुणे मार्गावरील एका निर्जन ठिकाणी रक्ताच्या थारोळ्यात पडलेला होता. काही स्थानिक ग्रामस्थ आपल्या नातेवाईकांना जमीन दाखवण्यासाठी जंगलाच्या भागात गेले असताना त्यांना मृतदेह दिसून आला. त्यांनी या घटनेची माहिती तात्काळ पोलिसांना दिली, त्यानंतर माणगाव पोलीस पथकाने घटनास्थळी धाव घेऊन तपास सुरू केला.

प्राथमिक माहितीनुसार, या तरुणावर धारदार शस्त्राने वार करून त्याची निर्घृण हत्या करण्यात आली आहे. पोलिसांना असा संशय आहे की, हत्येचा हा प्रकार दुसऱ्या एखाद्या ठिकाणी घडला असावा आणि केवळ पुरावा नष्ट करण्यासाठी मृतदेह ताम्हिणी घाटातील आडवाटेवर आणून फेकला गेला. या मृतदेहाची ओळख अद्याप पटलेली नसून मृतकाचे वय ३० वर्षांच्या आसपास आहे.



सध्या मृत तरुणाची ओळख पटवणे हे सर्वात मोठे आव्हान आहे. यासाठी पुणे आणि रायगड जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांमध्ये अलीकडच्या काळात बेपत्ता झालेल्या तरुणांची माहिती गोळा केली जात आहे.

## खाजगी सावकारांवर गुन्हा दाखल; साडेसहा लाखांच्या बदल्यात १२ लाख उकळले

**लोणी काळभोर, ता. १२ :** मूळ मुद्दलवर व्याजाच्या मोबदल्यात १० टक्के ते ७० टक्के प्रमाणे परतावा घेऊन देखील आणखी पैशाची मागणी केली. याबाबत पोलीसांत तक्रार केल्यास, जीपला बांधुन गावातून वरात काढतो अशी धमकी खाजगी सावकारांनी एका पेंटरला दिल्याची घटना घडली आहे. ही घटना लोणी काळभोर (ता. हवेली) ग्रामपंचायत हद्दीतील राहींजवस्ती परिसरात सन २०१९ ते २०२५ या कालावधीत घडली आहे.

यात्रकरणी लोणी काळभोर पोलीस ठाण्यात ४ ते ५ जणांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. शाम वामन सावंत व इतर २ ते ४ इसमांवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याप्रकरणी एका ४३ वर्षीय पेंटिंगची कामे करणाऱ्या कामगाराने लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, फिर्यादी यांनी




आरोपींकडून वेळोवेळी मुद्दल रक्कम ६ लाख ५९ हजार ३७५ रुपये घेतले होते. आरोपींनी १० टक्के ते ७० टक्के प्रमाणे व्याजापोटी ऑनलाईन व रोख स्वरुपात १२ लाख रुपये घेतले.

परंतु, आरोपी शाम सावंत याने फिर्यादीकडे आणखी ४ लाख रुपये मुद्दल असल्याचे सांगितले. त्याबदल्यात फिर्यादी यांच्या पत्नीच्या मैत्रिणीची राहींजवस्ती येथील गट नं. ४७ मधील १ गुंठा जमीन साठेखत करुन घेतली आहे. त्यावर ५ लाख रुपये दिले असल्याचे लिहून घेतले आहे. त्या जागेचा ताबा घेण्यासाठी आरोपींचा प्रयत्न सुरु आहे. ताबा नको असेल तर अजून ४ लाख ५० हजार रुपयांची मागणी केली आहे.

दरम्यान, पैसे देता येत नसल्यास आरोपी फिर्यादी यांच्या पत्नीला म्हणाले की, तु व तुझी मुलगी धंद्यावर बस, व धंदा करुन पैसे फेड अशा अश्लिल भाषेत बोलुन त्यांचा विनयभंग केला आहे. तसेच पोलीसांत माझ्याविरुध्द तक्रार केल्यास, तुला जीपला बांधुन तुझी लोणीगावात वरात काढतो अशी धमकी आरोपींनी फिर्यादी यांना दिली आहे.

याप्रकरणी फिर्यादी यांनी तत्काळ लोणी काळभोर पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. त्यानुसार शाम वामन सावंत व इतर २ ते ४ इसमांवर भारतीय न्याय संहीता कलम ३३३, ७९, ३५२, ३५१(२) महाराष्ट्र सावकारी अधिनियम २०१४ चे कलम ३९, ४५ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सहाय्यक पोलीस निरीक्षक कृष्णा बाबर करत आहेत.

# घरकुल योजनेत अनुदान वाढले; घराच्या छतावर बसणार मोफत 'सूर्यघर'

**पुणे, ता. १२ :** केंद्र शासनाच्या प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत घरकुल मिळणाऱ्या लाभार्थ्यांसाठी यंदाचे वर्ष दिलासादायक ठरणार आहे. घरकुल अनुदानासोबतच आता सौरऊर्जेचा अतिरिक्त लाभ देण्याचा महत्त्वाचा निर्णय शासनाने घेतला आहे. पर्यावरणपूरक ऊर्जेला चालना देण्यासाठी प्रधानमंत्री सूर्यघर योजना घरकुल योजनांशी जोडण्यात आली असून, त्यामुळे गरीब आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना दीर्घकालीन फायदा होणार आहे.

या योजनेअंतर्गत घरकुल लाभार्थ्यांच्या घराच्या छतावर सौरऊर्जा यंत्रणा बसवण्यासाठी १५००० रुपयांचे अतिरिक्त अनुदान दिले जाणार आहे. ही योजना जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा मार्फत राबवण्यात येणार असून, लाभार्थ्यांना स्वच्छ आणि स्वस्त वीज उपलब्ध करून देणे हा यामागचा मुख्य उद्देश आहे. सौरऊर्जेमुळे वीजबिलात मोठी बचत होणार असल्याने आर्थिकदृष्ट्या दुर्बल कुटुंबांवरील खर्चाचा ताणही कमी होणार आहे. अमरावती जिल्ह्यात २०२४-२५ या आर्थिक वर्षात सुमारे ८०००० घरकुल लाभार्थ्यांना या योजनेचा लाभ मिळू शकणार आहे. प्रधानमंत्री आवास योजना, रमाई आवास योजना तसेच यशवंत पंचायत राज अभियानांतर्गत मंजूर झालेल्या घरकुल लाभार्थ्यांचा या योजनेत समावेश करण्यात आला आहे. ही योजना ऐच्छिक स्वरूपाची असून इच्छुक लाभार्थ्यांनाच सौरऊर्जा प्रकल्पाचा लाभ घेता येणार आहे. प्रधानमंत्री सूर्यघर योजनेतून घराच्या छतावर १ किलोवॅट क्षमतेपर्यंत सौरऊर्जा प्रकल्प उभारण्यासाठी अनुदान दिले जाणार आहे. यामुळे घरगुती वापरासाठी लागणारी वीज सौरऊर्जेतून उपलब्ध होणार असून पारंपरिक विजेवरील अवलंबित्व कमी होईल.



या योजनेत लाभार्थ्यांचा स्वतःचा आर्थिक वाटा अत्यल्प ठेवण्यात आला आहे. राज्य शासनाकडून सौरऊर्जेसाठी ५०००० रुपयांपर्यंत अतिरिक्त अनुदान देण्यात येणार आहे. सौरऊर्जा प्रकल्पासाठी लाभार्थ्यांना केवळ २५०० ते ५००० रुपये स्वतः भरावे लागणार असल्याने ही योजना सर्वसामान्यांसाठी परवडणारी ठरणार आहे. दारिद्र्यरेषेखालील लाभार्थ्यांना राज्य शासनाकडून १७५०० रुपये आणि केंद्र शासनाकडून ३०००० रुपये अनुदान मिळणार आहे. सर्वसाधारण गटातील लाभार्थ्यांना राज्य शासनाकडून १०००० रुपये तर केंद्र शासनाकडून ३०००० रुपये अनुदान दिले जाणार आहे. अनुसूचित जाती आणि अनुसूचित जमातीतील लाभार्थ्यांसाठी लाभार्थी हिस्सा ५००० रुपये, राज्य शासन १५००० रुपये आणि केंद्र शासन ३०००० रुपये असा अनुदानाचा वाटा निश्चित करण्यात आला आहे.